संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिद्ध..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ८३ | ३/८/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४

लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेंद्र
१९६९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर | बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग | होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30% 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे मसाले
चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com

# श्रावणातही जाणताराजा मैदानावर तळीरामांचा मेळा!

## शहर पोलिसांचा अचानक छापा

## मद्य रिचवणाऱ्यांची एकच पळापळ



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

परमिटरुममध्ये बसून दारु पिण्यासाठी अतिरीक्त शुल्कांसह ओळख उघड होण्याचीही भीती असल्याने गेल्याकाही वर्षांपासून सार्वजनिक आडोशाच्या जागांवर तळीरामांचा वावर वाढला आहे. त्यातही संगमनेरातील जाणताराजा राजा मैदानासह प्रवरा आणि म्हाळुंगी नद्यांच्या काठांवरही तळीरामांचे मेळे भरु लागल्याने त्यातून परस्परांमध्ये वादावादी होवून परिसरातील वातावरणही दुषित होत आहे. सार्वजनिक ठिकाणांवर बसून बिनधास्त मद्य रिवणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी अशी वारंवार मागणीही होत असते. त्याला अखेर प्रतिसाद देत शहर पोलिसांनी शुक्रवारी सायंकाळनंतर अशा ठिकाणांवर अचानक छापे घालून नऊजणांवर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई केली आहे. या छापासत्रादरम्यानच आडोशाचा फायदा घेत 'कल्याण' मटका चालवणाऱ्यासह चक्क पोलीस ठाण्याच्या परिसरातच हातात कोयता घेवून दहशत निर्माण करणाऱ्या एकाच्या मुसक्याही आवळण्यात आल्या आहेत. या कारवाईने परिसरात राहणाऱ्यांनी समाधान व्यक्त करतानाच कारवाईत सातत्याची अपेक्षाही व्यक्त केली आहे.

याबाबत संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार यातील पहिली कारवाई नेहरु चौकातील एका बोळाच्या आडोशाला सुरु असलेल्या 'कल्याण' नावाचा मटका चालवणाऱ्या ठिकाणावर करण्यात आली. या छाप्यात आकडा घेणाऱ्या अर्जुन रुपचंद पवार (वय ३९, रा.नवघर गल्ली) याच्यावर महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार कारवाई करीत त्याच्या ताब्यातून साडेआठशे रुपयांच्या रोकडसह आकडा घेण्याचे साहीत्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल हरिश्चंद्र बांडे यांनी फिर्याद दिली आहे. या कारवाईनंतर पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांनी आपला मोर्चा सार्वजनिक ठिकाणांचा नशेखोरीसाठी वापर करणाऱ्यांच्या दिशेने वळवला.

शासकीय वाहन पाहून नशेबहाद्दर गायब होवू नयेत यासाठी पोलिसांनी आपल्या वाहनावरील दिवा बंद करुन संगमनेर टेक्सटाईलजवळील रस्त्याने व्हाया बालभवनजवळून थेट जाणताराजा मैदानावर **(पान ३ वर)**

- सध्या श्रावणमास असल्याने शहर व परिसरातील बिअरबार व वाईन शॉपमधील गर्दी काही प्रमाणात घटली आहे. अशावेळी शहर पोलिसांनी जाणताराजा मैदान आणि पंचवटी जवळील खाद्यान्नाच्या हातगाडीवर कारवाई करीत नऊजणांवर कायद्याचा धाक निर्माण केला. या कारवाईत २५ ते ३८ वयोगटातील आठजणांचा समावेश आहे. ऐन श्रावणमासात झालेल्या कारवाईतून आजची तरुणाई किती वेगाने नशेच्या आहारी जात आहे याचेही उदाहरण उभे राहीले आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईतून ताब्यात घेतलेल्या नऊजणांवर अटकेची कारवाई झाली नसली तरीही या सर्वांना रात्रभर पोलीस ठाण्यात बसवण्यात आले होते. त्यांच्या पालकांनी 'त्या' रात्री आपली मुलं कोठे होती? याची त्यांच्याकडे विचारणा करण्याची आणि त्यांना वेळीच यापासून परावृत्त करण्याची गरज आहे.

# भंडारदरा धरणाचा शताब्दी महोत्सव!

## मुख्यमंत्री फडणवीस महोत्सव समितीचे अध्यक्ष

**नायक वृत्तसेवा, अकोले**

भंडारदरा जलाशयाचे संवर्धन आणि या भागातील पर्यटनाला संधी निर्माण करून देण्याच्या उपाय योजनांच्या सूचना आणि त्यादृष्टीने कराव्या लागणाऱ्या उपाय योजनांसाठी संबंधित विभागांशी समन्वय साधून आढावा घेण्याकरीता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली भंडारदरा शताब्दी महोत्सव समिती



स्थापन करण्यात आली असून, **(पान ३ वर)**

# ब्राह्मणवाड्यात चोरट्यांचा धुमाकूळ!

## घरातील सदस्यांना मारहाण; धाक दाखवत दागिने लुटले

**नायक वृत्तसेवा, अकोले**

तालुक्यातील ब्राम्हणवाडा गावातील कण्हेर ओहळ येथे शुक्रवारी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास एका घरावर सहा चोरट्यांनी सशस्त्र दरोडा टाकत घरातील तीन जणांना लोखंडी सळई आणि चाकूचा धाक धाकवत मारहाण केली.

ब्राह्मणवाडा येथील हसन पीरमोहम्मद पटेल यांच्या घरात ही घटना घडली. यावेळी घरात हसन पटेल, त्यांची पत्नी खालीमा हसन पटेल आणि बाळंतपणासाठी आलेली त्यांची **(पान ३ वर)**

अशी संधी एकदाच येते !
MONSOON DHAMAKA
₹1500 ते ₹5000 ची साडी
फक्त ₹499/-
स्टॉक कधीही संपू शकतो आजच भेट द्या !
भंडारी सिल्क ॲण्ड सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर, जि. अहिल्यानगर

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

सेल सुरु झालाय
भव्य जागेत भव्य सेल
सेल SUPER SALE सेल
20 ते 50% पर्यंत डिस्काउंट
टी-शर्ट । जीन्स ₹100/- | टॉप । लेगिंग ₹100/- | चुडीदार । वनपीस ₹300/- | फ्रॉक । वेस्टर्न ₹300/-
सारीका चिल्ड्रन ॲण्ड लेडीज वेअर
बाजारपेठ, प्रतिभा फोटो शेजारी, संगमनेर 98223 58335

आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
ओममयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरूपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
डॉ.सौ. उज्ज्वला जठार
एम.बी.बी.एस., डी.सी.एच., कन्सल्टंट पेडिॲट्रिशियन
तज्ञ - बालरोग, नवजात अर्भक, प्रिमॅच्युअर बेबी केअर
डॉ.नितीन जठार
एन.बी.बी.एस. डी.टी.सी.डी., कन्सल्टंट फिजिशियन
तज्ञ - छातीचे, हदयरोग, टी.बी. व दम्याचे विकार
उपलब्ध निदान सुविधा
अत्याधुनिक अतिदक्षता विभाग | जनरल सर्जरी | आपत्कालिन औषधे व उपचार | मधुमेह व हदयरोग | दमा व श्वसनाचे | फुफ्फुसासंबंधी औषधोपचार | बालरोग चिकित्सा विभाग | सर्पदंश व विषबाधा | पोटाचे विकार औषधे व शस्त्रक्रिया | किडनी विकार | संधीवात व मनके विकार | मेंदु विकार व शस्त्रक्रिया
सी.टी. स्कॅन, डायलिसीस, डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी, 2-डि इको, स्पायरोमेट्री, पॅथोलॉजी (लॅब)

काजळ ज्वेलर्स
मार्केट मधील सर्वात कमी भाव
सोने विमा संरक्षण उपलब्ध
सुवर्ण बचत भिशी उपलब्ध
बस स्टॅंड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

भरपूर ऑफरसह नाविन्याने नटलेला...
कुर्तीज फेस्टीवल
मुंबई, अहमदाबाद, जयपुर, दिल्ली, कलकत्ता, लखनऊ, बॅंगलोर येथील उत्कृष्ट डिझाईनर्सने बनविलेल्या कुर्तीवर मिळवा
20 TO 50% OFF
भंडारी
मेनरोड कॉर्नर, संगमनेर 02425 225719

सुविचार : संकटापेक्षा संशय यशाला फार घातक आहे.

## बुद्धीबळातील महाराणी

नागपूरच्या दिव्या देशमुखने सोमवारी वयाच्या १९व्या वर्षी बुद्धिबळातील नवी राणी बनण्याचा मान मिळवला. जॉर्जिया येथे झालेल्या महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत दिव्याने भारताच्याच कोनेरू हम्पीवर अंतिम फेरीत टायब्रेकरमध्ये मात केली. याबरोबरच दिव्याने सर्वात युवा विश्वविजेती ठरण्याची किमया साधली. दिव्याच्या या कामगिरीवर चोहीकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. २०२१ पासून महिलांच्या बुद्धिबळ विश्वचषकाला प्रारंभ झाला. यापूर्वी फक्त पुरुषांसाठीच विश्वचषक खेळवण्यात यायचा. यापूर्वी २०२१ व २०२३ मध्ये झालेल्या महिलांच्या विश्वचषकात भारताची एकही बुद्धिबळपटू उपान्त्य फेरीपर्यंत पोहोचली नव्हती. दिव्या प्रथमच विश्वचषकात सहभागी झाली होती. ग्रँडमास्टर हा 'नॉर्म' मिळवण्यासाठी दिव्याला या स्पर्धेत छाप पाडणे गरजेचे होते. फिडे म्हणजेच आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघातर्फे आयोजित जागतिक पातळीवरील स्पर्धांमध्ये अपेक्षित गुण कमावण्यासह मानांकित खेळाडूंना पराभूत केले तरच 'ग्रँडमास्टर' हा नॉर्म मिळतो. दिव्याने या स्पर्धेत तिच्यापेक्षा जागतिक क्रमवारीत वरच्या स्थानी असलेल्या खेळाडूंना नमवण्याचा पराक्रम केला. त्यामुळेच ती ग्रँडमास्टर किताब मिळवणारी भारताची चौथी महिला ठरली. यापूर्वी हम्पी, द्रोणावली हरिका व आर. वैशाली यांनी अशी कामगिरी केली आहे. मुख्य म्हणजे हम्पीने २००२ मध्ये ग्रँडमास्टर हा नॉर्म मिळवला, तेव्हा दिव्याचा जन्मही झाला नव्हता. २००५ मध्ये जन्मलेल्या दिव्याने कनिष्ठ गटात जागतिक स्पर्धा जिंकली. तेव्हापासून तिने मागे वळून पाहिले नाही. नागपूरमध्ये जन्मलेल्या दिव्याचे आई-वडील हे दोघेही डॉक्टर आहेत. आई नम्रता ही दिव्यासोबत प्रामुख्याने सर्व स्पर्धांसाठी जाते. विश्वचषक विजयानंतर दिव्याने सर्वप्रथम धावत येऊन आईला घट्ट मिठी मारली. हा क्षण खूपच भावनिक होता. शालेय वयापासूनच दिव्याला बुद्धिबळाची आवड निर्माण झाली. वयाच्या पाचव्या वर्षापासून तिने बुद्धिबळ खेळण्यास प्रारंभ केला. तिने जिल्हास्तरीय स्पर्धेत उत्तम यश मिळवले. नंतर कनिष्ठ वयोगटातील स्पर्धांमध्येही तिने छाप पाडली. २०२१ मध्ये तिने महिला ग्रँडमास्टर हा नॉर्म मिळवला. २०२२ च्या चेस ऑलिम्पियाडमध्ये तिने कांस्यपदक मिळवले. त्याच वर्षी तिने राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम केला. २०२० मध्ये ऑनलाईन ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताने जेतेपद मिळवले, त्यावेळी दिव्या त्या स्पर्धेचा भाग होती. २०२३ मध्ये दिव्याने आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टरचा नॉर्म मिळवला. २०२४ मध्ये भारताने ऑलिम्पियाडमध्ये दुहेरी सुवर्ण जिंकले. त्यावेळी महिला संघाच्या विजयात दिव्याचे मोलाचे योगदान होते. त्याच वर्षी तिने २० वर्षांखालील जागतिक स्पर्धा जिंकण्याचा विक्रम केला. त्यामुळे जगभरात दिव्याचे नाव झाले. १०७ खेळाडूंसह यंदाच्या विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली. दिव्याला या स्पर्धेसाठी १५ वे मानांकन होते तर अंतिम फेरीतील भारतीय स्पर्धक हम्पीला चौथे मानांकन होते. दिव्याने पहिल्या दोन फे-यांमध्ये सहज विजय मिळवले. चौथ्या फेरीत तिच्यासमोर चीनच्या दुस-या मानांकित झू जायनरचे आव्हान होते. दिव्याने तिला नमवून सा-यांनाच धक्का दिला. उपान्त्यपूर्व फेरीत दिव्याने आपल्याच देशाच्या हरिकावर सहज मात केली. उपान्त्य फेरीत दिव्यासमोर चीनच्या तिस-या मानांकित टॅन झोंगाईचे कडवे आव्हान होते. कारण टॅनने जागतिक विजेतेपद मिळवले असून कँडिडेट्स स्पर्धाही जिंकली आहे. दिव्याने तिलाही धूळ चारली. दुसरीकडे हम्पीनेसुद्धा उपान्त्य फेरीत चीनच्या अग्रमानांकित ले टिंगेईला पराभूत केले. त्यामुळे प्रथमच भारताचे दोन बुद्धिबळपटू अंतिम फेरीत दाखल झाले. अंतिम फेरीत हम्पीचे पारडे जड होते. कारण तिच्याकडे इतक्या वर्षांचा अनुभव होता शिवाय ती कँडिडेट्स स्पर्धाही खेळली होती. परंतु दिव्याने आपल्या देहबोलीने हम्पीला दबावात आणले. दिव्या झटपट चाली रचत होती तर हम्पी विचारपूर्वक खेळत होती. पहिला डाव बरोबरीत सुटल्यावर हम्पीला संधी होती. परंतु दिव्याने उत्तम बचाव केला. टायब्रेकरमध्ये दिव्याने संयम बाळगून हम्पीला चुका करण्यास भाग पाडले. मुख्य म्हणजे दिव्याकडे प्रत्येक चालीसाठी पुरेसा वेळ होता. कदाचित त्याचे हम्पीवर दडपण आले असावे. अखेर टायब्रेकरमध्ये हम्पी मागे पडली. तिने पुढील डावाचा विचार केला तर दिव्याने मात्र सुरू असलेल्या डावावर लक्ष केंद्रित केले. जणू काही तिला अर्जुनाप्रमाणे फक्त पक्ष्याचा डोळा दिसत होता! त्यामुळे पुढील डावात काय होईल याचा विचार न करता दिव्याने जे डोळ्यासमोर सुरू आहे त्यावर लक्ष देत सामना जिंकण्यासाठी सर्वस्व पणाला लावले. याचेच फलित म्हणजे हम्पीने हार मानली आणि दिव्याने बाजी मारली. हम्पी मानसिकदृष्ट्या कणखर असली तरी दिव्याचा आत्मविश्वास व सकारात्मक देहबोलीसमोर ती डगमगताना दिसली. महिला विश्वचषकासह दिव्याने भारताची ८८ वी ग्रँडमास्टर होण्याचा मान पटकावला आहे. अंतिम फेरीतील दोन्ही क्लासिकल डाव बरोबरीत सुटल्यानंतर दिव्याने टायब्रेकरद्वारे विश्वविजेतेपदाचा निकाल आपल्या बाजूने झुकवला. दिव्याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन केले आहे. तिच्या कामगिरीमुळे अनेक तरुणांना प्रेरणा मिळेल. कोनेरू हम्पीनेसुद्धा संपूर्ण स्पर्धेत प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज दिली. विशेष म्हणजे जागतिक पातळीवरील टॉप २० पैकी १७ बुद्धिबळपटू या स्पर्धेत होते. त्यामुळे अवघ्या १९ वर्षांच्या दिव्याचे हे यश आणखीनच उजळून निघाले आहे. बुद्धिबळातील मानाचा ग्रँडमास्टर किताब मिळवण्यासाठी २५०० मानांकन (रेटिंग) आणि ग्रँडमास्टरचे तीन नॉर्म आवश्यक असतात. मात्र विश्वविजेतेपदामुळे तिला हा किताब थेट मिळाला. तिचे हे यश तिच्या दुर्दम्य जिद्दीचे आणि दृढतेचे प्रतीक आहे. बुद्धिबळ जगतात भारताचा तिरंगा डौलाने फडकविणा-या मराठमोळ्या दिव्या देशमुखचे मन:पूर्वक अभिनंदन!

## प्रदेश काँग्रेसच्या जनरल सेक्रेटरीपदी प्रभावती घोगरे यांची निवड

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने जाहीर झालेल्या नवीन समितीमध्ये महिला नेत्या प्रभावती जनार्दन घोगरे यांची राज्य जनरल सेक्रेटरीपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा सत्कार करण्यात आला.

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथे राज्य जनरल सेक्रेटरी पदावर निवड झाल्याबद्दल प्रभावती जनार्दन घोगरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, महिला काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष पद्मा थोरात, शितल उगलमुगले, मीना थेटे, अमोल घोगरे, सचिन मुन्ना आहेर, दीपक विखे,



शामराव घोगरे,दीपक घोगरे, जया गाडे, गौतम आहेर, सुभाष गुंजाळ यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

प्रभावती घोगरे यांनी कृषी क्षेत्रात आदर्शवत काम केले असून महिलांचे मोठे संघटन केले आहे. त्या राहाता मतदार संघातील काँग्रेसच्या नेत्या असून विधानसभा निवडणूक त्यांनी काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर लढवली. मोठा जनसंपर्क, सहज संवाद, कृषीप्रधान संस्कृती आणि जनसेवेचा समर्थ वारसा यामुळे त्या अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये महिलांमध्ये अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या जनरल सेक्रेटरी त्यांची निवड झाली आहे.

प्रभावती घोगरे म्हणाल्या की, आपण कायम सर्वसामान्य शेतकरी, गोरगरीब यांच्या हिताचा विचार केला आहे. काँग्रेस पक्षाने आपल्यावर मोठा विश्वास टाकला. माझ्या निवडणुकीच्या प्रचारासाठी राष्ट्रीय नेत्या प्रियांका गांधी या उपस्थित होत्या. मात्र राहाता विधानसभेमध्ये निवडणूक प्रक्रियेचा झालेला गोंधळ सर्व देशाला माहीत झाला आहे. यापुढील काळात महिला सबलीकरणासाठी अधिक सक्रियतेने काम करू असे त्या म्हणाल्या.

## हृदयरोग शिबिराचा ७० रुग्णांनी घेतला लाभ

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषीजी महाराज यांच्या १२६ व्या जन्म जयंतीचे औचित्य साधून नाशिकच्या मॅगन्म मल्टी स्पेशालीस्ट हॉस्पीटल व भारतीय जैन संघटना शाखा आश्वी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत हृदयरोग निदान शिबीर उत्साहात पार पडले. यावेळी ७० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

आश्वी बुद्रुक येथील जैन स्थानकात मॅगनम मल्टी स्पेशालीस्ट हॉस्पीटल व भारतीय जैन संघटना आश्वी शाखा आयोजीत हृदयरोग निदान उपचार शिबीराचे उदघाटन डॉ. राहुल शेवाळे, डॉ. समाधान बाहेकर, भारतीय जैन संघटनेचे विभागीय अध्यक्ष संजय शिंगी, अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सचे सदस्य व श्रावक संघाचे अध्यक्ष सुमतीलाल गांधी, आश्वी शाखाध्यक्ष सागर रातडीया, राजेंद्र लुणीया, योगेश रातडीया, सुशील भंडारी यांचा हस्ते संपन्न झाले. या शिबिरात रुग्णांची रक्तातील साखर, ई सी जी, रक्तदाब, सह सुमारे दहा हृदयरोग तपासण्या मोफत करण्यात आल्या. या वेळी डॉ. राहुल शेवाळे यांनी रुग्णांना हृदयरोगाची कारणे व काळजी या विषयी मार्गदर्शन केले.मोफत शिबीराचा सुमारे ७० रुग्णांनी लाभ घेतला. शिबीर यशस्वी करण्यासाठी अथर्व रातडीया, संयम लुंकड, रोशन रातडीया, भुषण भंडारी, कु. अमीता भंडारी, यश भंडारी, कुसिया गांधी, कु दिया लुंकड यांनी परिश्रम घेतले.प्रास्ताविक कु. जिनेशा गांधी, कु. राधिका नाके, अभिजीत गांधी,विनित गांधी,रोहित भंडारी यांनी केले. आभार श्रेणीक बोरा यांनी मानले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळण्यासाठी पाठपुरावा करणार : आ. खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी ब्रिटिश राजवटीच्या विरोधात संघर्ष करून आपल्या समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी काम केले. तसेच त्यांनी लेखणीच्या माध्यमातून ब्रिटिश राजवटीच्या विरोधात अन्यायाचा प्रतिकार करत समाजप्रबोधन केले, अशा महान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळण्यासाठी आपण विधिमंडळाच्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आवाज उठवुन पाठपुरावा करणार असल्याचे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

लहुजी शक्ती सेना आणि महायुतीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त आमदार खताळ यांनी लोकशाहीर साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. यावेळी रामभाऊ राहाणे, माजी नगरसेवक ज्ञानेश्वर कर्पे, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, दिपाली वाव्हळ, वैशाली तारे, पायल ताजणे, कविता पाटील, रेखा गलांडे, रेश्मा खांडरे, कांचन ढोरे, रोहिणी हारदे, भारती पगारे, दीपक खरात, राम सुरळकर, दीपक आव्हाड, संजय शिंदे, अण्णा कसबे, ओम खडांगळे, श्याम राणे, योगेश घोगरे, गणेश सस्कर आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना सरकारने भारतरत्न घ्यावा अशी मागणी यावेळी जनता दल सेक्युलर पक्षाचे प्रदेश सचिव विनायक माळवे, शिवसेनेचे शहर प्रमुख दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, मंजाबापू साळवे, सपना जाधव, किशोर वाघमारे यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली. तुमच्या मागणीचा विचार करून लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळण्यासाठी आपण स्वतः विधिमंडळात मागणी करून शासन दरबारी पाठपुरावा करू असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. प्रस्ताविक मंजाबापू साळवे यांनी केले. स्वागत संतोष बलसाने, सूत्रसंचालन अजित जाधव यांनी तर आभार कैलास कासार यांनी मानले.



## ज्ञानेश्वरी पारायण हा अमृत अनुभव : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची परंपरा असून विविध जाती धर्मातील संतांनी प्रेमाचा व समतेचा संदेश सर्वांना दिला आहे. ज्ञानेश्वरी पारायण हा अमृत अनुभव असून ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरी हे महाकाव्य संपूर्ण विश्वाला दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील अमृतेश्वर मंदिरात ४० व्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या दीपोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कांचन थोरात, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, गोविंद महाराज करंजकर, चंद्रलेखा काकडे, संचालक नवनाथ आरगडे, योगेश भालेराव, रामनाथ कुटे, अंकुश ताजणे, विनोद हासे, ॲड. बाबासाहेब गायकर, लता गायकर, ॲड. अशोक हजारे, कार्यकारी संचालक जगन्नाथ



घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे, कार्याध्यक्ष रामदास तांबडे, अरुण महाराज फरगडे, संदीप दिघे, नवनाथ गडाख, अशोक मुटकुळे, अरुण जोंधळे, राजू बड, यांच्यासह अमृत सांस्कृतिक मंडळाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू असून महिलांची मोठी उपस्थिती आणि ज्ञानेश्वरी पारायण हे या सप्ताहाचे वैशिष्ट्य राहिले आहे. दीपोत्सव हा आनंदाचा क्षण असून बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असल्याचे ते म्हणाले.

यावेळी अमृतनगर, घुलेवाडीसह संगमनेर मधील भाविक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी गोविंद महाराज करंजकर,अरुण महाराज फरगडे व चंद्रलेखा काकडे यांनीही मनोगत व्यक्त केले. आभार कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी मानले.

## मंगळवारी पालिका आवारात कुत्रे छोडो आंदोलन

**नायक वृत्तसेवा, श्रीरामपूर**

शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या सध्या प्रचंड प्रमाणात वाढली असल्याने शहरातील नागरीकांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. याबाबत मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा यासाठी समाजवादी पार्टीचे उत्तर नगर जिल्हाध्यक्ष जोएफ जमादार यांनी २१ जुलै रोजी नगर पालिका मुख्यधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. मात्र यावर अद्यापही कार्यवाही न झाल्याने मंगळवार दि.५ ऑगस्ट रोजी पालिका कार्यालयात कुत्रे सोडो आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती जोएफ जमादार यांनी दिली.

जमादार यांनी म्हटले आहे की, सध्या श्रीरामपूर शहरात मोकाट कुत्र्यांचे प्रमाण खुपच वाढले असून त्यावर श्रीरामपूर नगर पालिका प्रशासनाच्यावतीने कोणतीही उपाय योजना तथा योग्य नियंत्रण होत नसल्याचे आढळून येत असल्याने शहराच्या सर्वच परिसरात मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. या मोकाट कुत्र्यांच्या चावण्याने निरपराध नागरिकांच्या जीवीतास काही बरे वाईट झाले तर याची जबाबदारी कोणाची? नगर पालिका प्रशासन ही जबाबदारी घेणार का?, भरपाई देणार का?, असे एक ना अनेक प्रश्न जमादार यांनी



उपस्थित केले असून

नगर पालिका प्रशासनाने आपले स्तरावरुन सदरील प्रश्नी योग्य निर्णय घेऊन तात्काळ उचित कार्यवाहीचे आदेश देत या मोकाट कुत्र्यांचा योग्य तो बंदोबस्त करावा, अन्यथा नगर पालिका कार्यालय आवारात कुत्रे सोडो आंदोलन हाती घेतले जाईल असा इशाराही समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष जोएफ जमादार यांनी नगर पालिका प्रशासनास दिला आहे.

## परमार्थ तारुण्यातच व्हावा, म्हातारपणी नव्हे : डॉ. मिसाळ

**नायक वृत्तसेवा, राहाता**

परमार्थ हा तारुण्यातच व्हावा, म्हातारपणी नाही. व्यक्तीला आपल्या वाईट कृत्याचा पश्चात्ताप होणे, हे सर्वात मोठे प्रायश्चित असून, मानवाने आपले दुःख लोकांसमोर न मांडता, ते आपल्या इष्ट देवतांसमोर मांडावे, म्हणजे आपले मन मोकळे होईल. आपले इष्ट देवता आपल्याला त्या दुःखातून मुक्त करील, असा उपदेश डॉ. विकासानंद मिसाळ यांनी केला.

राहाता येथे आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते रविशंकर गुरुजी यांच्या संकल्पनेतून शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. विकासानंद मिसाळ महाराज म्हणाले, कथेकडे साधू संतांना पाहण्याचा दृष्टिकोन हा त्रिवेणी संगमासारखा असून, यात देवभक्त व भक्तांचे नामस्मरणाचा समावेश होतो. कथा ऐकताना भगवंतापर्यंत जाण्याचा उद्देश असला पाहिजे, म्हणजेच यातून फलप्राप्ती झाली पाहिजे. फलश्रुती प्राप्त करण्यासाठी इच्छा, प्रयत्न, भगवंताची कृपा व साक्षरता या चार गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. सामान्य लोक परमार्थ साध्य करण्यासाठी देवाकडे साधन म्हणून बघतात. यालाच प्रपंचसाध्य म्हणतात. हा परमार्थ प्रपंच चांगला होण्यासाठी केला जातो. शंकर भगवान हे सर्वत्र असून ते शिवभगवान आहेत. अनुग्रहासाठी परीक्षा द्यावी लागते, तर शिव ही देवता अनुग्रह करणारी आहे. कथा ऐकणे म्हणजे सत्संग असून, महाकथेचे मनन केल्यास आत्मबोध प्राप्त होतो व कथेचा निजीध्यास घेतल्यास साक्षात्कार होतो. खऱ्या अर्थाने संतांचे विचार कथेच्या माध्यमातून मानवी जीवनात उतरावेत, यासाठी भगवंतांची कथा ऐकताना मन स्थिर असले पाहिजे. आपल्या धर्मात १६ संस्कार सांगितले आहे.

मुलांवर आज चांगले संस्कार करण्याची गरज आहे. शिवमहापुराण कथा ही माणसाला सर्व आजारातून मुक्त करणारी कथा असून, ती मोक्षापर्यंत घेऊन जाणारी आहे. शिवापुराण प्रत्यक्ष शिवाने सांगितली आहे. भगवान शंकर ही ज्ञानाची देवता असून, ज्ञान प्राप्तीसाठी भगवान शंकराची उपासना करणे आवश्यक आहे. ज्ञानाशिवाय मोक्ष प्राप्त होऊ शकत नाही. समाजात चांगल्या गोष्टी लक्षात राहत नाहीत, परंतु वाईट गोष्टींचा प्रसार जलद गतीने होऊन तो लक्षातही राहतो, असे डॉ. मिसाळ महाराज म्हणाले.

# शिर्डी मतदार संघात नवीन उद्योगांच्या संधी वाढणार!

## खा. वाकचौरे व पोखरकर यांची सकारात्मक चर्चा

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालयाचे सल्लागार संदीप पोखरकर यांनी नुकतीच शिर्डी लोकसभा मतदार संघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान मतदार संघात नवीन उद्योगधंद्यांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती कशी करता येईल यावर दोघांमध्ये सखोल चर्चा झाली.

या भेटी दरम्यान कामगार आयुक्त रेवननाथ भिसले, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अधिकारी प्रफुल्ल रहाणे, हेमंत भंडारी, मुकुल कुलकर्णी, आशिष शिंदे उपस्थित होते.



या बैठकीत स्थानिक तरुणांना रोजगार मिळावा, स्थलांतर थांबवावे आणि ग्रामीण भागातही उद्योगांची चळवळ निर्माण व्हावी, यासाठी केंद्र शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोखरकर यांनी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या अनुदान योजना, स्टार्टअप प्रोत्साहन योजना, तसेच पीएमईजीपी, एससी - एसटी हब, एमएसई - सी डी पी, सीजीटी एमएसई, यांसारख्या योजनांबद्दल माहिती दिली. तसेच या योजनांमधून महिलांना देखील कर्ज, प्रशिक्षण, मार्केटिंग सपोर्ट मिळू शकतो.त्यामुळे महिला उद्योजक घडवण्यासाठी मोठी मदत होणार असल्याचे सांगितले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले, संदीप पोखरकर हे एक अधिकारी असून, सध्या केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जितनराम मांझी यांचे सल्लागार म्हणून जबाबदारीने काम पाहत आहेत. ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. शिर्डी लोकसभा मतदार संघात बेरोजगारी कमी करणे आणि स्थानिक युवकांना योग्य संधी उपलब्ध करून देणे हे आपले प्राथमिक उद्दिष्ट आहे. केंद्र शासनाच्या योजनांचा प्रभावी उपयोग करून मोठ्या प्रमाणात उद्योग, लघुउद्योग आणि उद्यमशीलता वाढवण्याचा मानस आहे. मंत्रालयामार्फत आवश्यक सहकार्य आणि मार्गदर्शन पुरवले जाईल. योग्य प्रकल्प अहवाल आणि स्थानिक गरजांनुसार कंपन्या व प्रकल्प आणण्यास प्राधान्य दिलं जाईल असे आश्वासन पोखरकर यांनी दिले. या भेटीमुळे शिर्डीमधील नागरिकांमध्ये आशा आणि उत्साह निर्माण झाला असून तरुणांना स्थानिक स्तरावर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी मिळण्याची शक्यता बळावली आहे.

> ■ या सकारात्मक चर्चेमुळे मतदारसंघात रोजगार, उद्योजकता आणि महिला सशक्तीकरण या तीन प्रमुख क्षेत्रांना नवे बळ मिळणार आहे. मतदारसंघात लवकरच यासंदर्भात उद्योग मेळावे, प्रशिक्षण कार्यशाळा व माहिती सत्रे आयोजित केली जाणार असल्याची माहितीही बैठकी दरम्यान देण्यात आली.

# निलम खताळ यांची साकुरच्या उर्दु शाळेला भेट

**नायक वृत्तसेवा, साकूर**

संगमनेर तालुक्यातील साकूर येथील जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक शाळेस आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी निलम खताळ यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सोयी सुविधांची माहिती घेतली. यावेळी निलम खताळ यांनी संगणक कक्षाचीही पाहणी केली. साकूर येथे जि. प. च्या उर्दु प्राथमिक शाळेत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतचे वर्ग असुन ९ वीचे वर्ग सुरु करण्याची मागणी या वेळी स्थानिकांनी केली.

भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे राज्य कार्यकारिणी सदस्य रौफ शेख यांनी यासाठी आमदार अमोल खताळ व पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातुन जि. प. कडे पाठपुरावा सुरु केला आहे.निलम खताळ यांनी या शाळेला भेट देत पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी निलम खताळ यांचे उत्साहात स्वागत केले. शाळेसाठी आवश्यक ते सहकार्य भविष्यात नेहमी देऊ अशी ग्वाही निलम खताळ यांनी यावेळी दिली.



तसेच शेंडेवाडी येथील अखंड हरीनाम सप्ताहाला त्यांनी भेट दिली. यावेळी रौफ शेख, बाळासाहेब खेमनर, बुवाजी खेमनर, सुभाष पेंडभाजे, संदीप खिल्लारी, सुभाष भुजबळ, अझहर पटेल, तुषार पेंडभाजे, मुख्याध्यापिका तब्बसुम शेख, शिक्षिका शाहिदा चौगुले, नफीसा कुरणे व शिक्षक सलीम, मणियार, मुजाहिद शाह उपस्थित होते.

# लोकशाहीर साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील सारोळे पठार येथील श्री बाळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य उत्तम खांडवी व शिक्षकांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन केले.



या कार्यक्रमांच्या निमित्ताने विद्यालयात वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या वकृत्व स्पर्धेमध्ये ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याप्रसंगी मधुकर बांबळे, भाऊराव धोंगडे, सुरेश देशमुख, विकास सोनवणे, रघुनाथ मेंगाळ, अशोक जाधव, गंगाधर पोखरकर, विठ्ठल फटांगरे, चेतन सरोदे, नारायण डोंगरे, संतोष भांगरे, श्रीकृष्ण वर्पे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रतीक्षा मराडे या विद्यार्थिनीने केले.

# सर्पदंशावरील प्रथमोपचारावर कोल्हेवाडीत मॉक ड्रिल

## नागपंचमीच्या निमित्ताने राबवला जनजागृती उपक्रम

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील कोल्हेवाडी (वाकानवस्ती) येथे नागपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर श्री साईबाबा मंदिर साई गुरुस्थान, कोल्हेवाडी यांच्या वतीने सापांविषयी जनजागृती कार्यशाळा आणि सर्पदंशावरील प्रथमोपचारावर आधारित मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी विजय काशिनाथ कांबळे होते. यावेळी वन्यजीव रक्षक दगु रुपवते यांनी, विषारी आणि बिनविषारी साप यांची ओळख पोस्टरच्या माध्यमातून करून दिली. डॉ. राजेंद्र कोल्हे यांनी सर्पदंशानंतर तातडीने करावयाच्या प्रथमोपचाराबाबत मार्गदर्शन केले. तसेच प्रशांत कांबळे यांनी 'साप - शेतकऱ्याचा मित्र' व 'साप आणि अंधश्रद्धा' या विषयावर माहितीपूर्ण विवेचन केले.

नागरिकांनी सापांविषयी अंधश्रद्धा न बाळगता योग्य माहिती बाळगण्याचे आणि सर्पदंशाच्या वेळी प्रशिक्षित सर्पमित्रांची मदत घेण्याचे आवाहन केले. तसेच साप निसर्गातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा घटक असून उंदीर, बेडूक यांचे प्रमाण नियंत्रित ठेवण्याचे कार्य करतो, त्यामुळे तो शेतकऱ्यांचाही मित्र असल्याचे सांगण्यात आले.



कार्यशाळेनंतर राबविण्यात आलेल्या मॉक ड्रिलमध्ये विराज कांबळे याने सर्पदंश झालेल्या बालकाची भूमिका साकारली. त्यानंतर राधिका ॲम्बुलन्स सर्व्हिसच्या मदतीने त्याला संगमनेर येथील पानसरे हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मॉक ड्रिलमध्ये डॉ. अजिंक्य म्हसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमासाठी श्रीनिवास अमृतवाड, महेश वामन, अविनाश कांबळे, अभिषेक कानडे, नरेंद्र कांबळे, गोरक्षनाथ कांबळे, सोमनाथ कांबळे यांच्यासह जि. प. प्राथमिक शाळा वाकण वस्ती येथील विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा उपक्रम सर्पदंशाविषयी जनजागृती घडविणारा आणि जीवनरक्षणाचे महत्त्व पटवून देणारा ठरला.

पान १ वरुन

**श्रावणातही जाणताराजा मैदानावर तळीरामांचा मेळा!**

प्रवेश केला. रात्री आठचा सुमार असल्याने संपूर्ण मैदानावर काळोख दाटलेला होता. त्यात काही ठिकाणी दोघे-तिघे अशा गटांनी मांड्या घालून बसल्याचे आणि नशेत तर्राट होवून मोठमोठ्याने आरडाओरड आणि शिवीगाळ करीत असल्याचे पोलिसांना दिसले. अशा गटांच्या जवळ वाहन नेत पोलिसांनी एकाचवेळी चारही दिशेने धाव घेण्यास सुरुवात करताच भानावर आलेल्या तळीरामांची पळापळ सुरु झाली, मात्र त्यातून त्यांना वाचता आले नाही. पोलिसांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र महानाट्याच्या रुपाने पाहिलेल्या आणि त्यांच्याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या या मैदानावर दारुचा नशा करुन शांतता भंग करणाऱ्या नऊजणांना ताब्यात घेतले.

त्यात संदीप रघुनाथ रिंधे (वय २९), साहील बाबासाहेब वर्पे (वय २५, दोघेही रा.कनोली), अक्षय सुनील दाणी (वय २६, रा.रंगारगल्ली), यशवंत भाऊसाहेब हासे (वय ३१, रा.चिखली), ललित शरद शिंपी (वय ३५, रा.अच्युतनगर) व अविनाश अशोक ओझा (वय ३८, रा.इंदिरानगर) अशा सहाजणांवर मुंबई दारुबंदी कायद्यान्वये कारवाई केली. त्यानंतर पोलिसांनी आपला मोर्चा पंचवटीजवळील फास्टफूडच्या हातगाड्यांकडे वळवला. यावेळी पोलिसांना जब्बार नवाब शेख (वय ३७, रा.अलकानगर), बाळासाहेब सयाजी भुजबळ (वय ५३, रा.इंदिरानगर) व बंडू आबा चितळे (वय ३८, रा.मालदाड रोड) अशा तिघांसह एकूण नऊजणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करीत त्यांना दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याच्या नोटीसा बजावल्या.

सदर प्रकरणात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरु असतानाच रात्री अकराच्या सुमारास पोलिसांना शहर पोलीस ठाण्याच्या समोरच असलेल्या संजय गांधीनगर वसाहतीत एकजण हातात कोयता घेवून दहशत निर्माण करीत असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांच्या एका पथकाने परिसरात जावून पाहीले असता मनोज अमृत खजुरे (वय ४१, रा.संजय गांधीनगर) हा इसम हातात कोयता घेवून शिवीगाळ व धमक्या देत असल्याचे दिसून आले. त्याला शस्त्रासह ताब्यात घेत कॉन्स्टेबल अजित कुऱ्हे यांच्या तक्रारीवरुन शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली.

जाणताराजा मैदान व पंचवटी हॉटेलच्या परिसरात करण्यात आलेल्या कारवाईत पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्यासह पोलीस कॉन्स्टेबल आत्माराम पवार, हरिश्‍चंद्र बांडे, विशाल करपे व सागर नागरे यांचा समावेश होता. या कारवाईने वाईन शॉपमधून कमाल विक्री दराने मद्य घेवून सार्वजनिक ठिकाणांवर रिचवणाऱ्या तळीरामांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी अशाप्रकारच्या कारवायांमध्ये सातत्य ठेवल्यास सार्वजनिक ठिकाणी सुरु असलेल्या अशा प्रकारांना आळा बसेल अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

**ब्राह्मणवाड्यात चोरट्यांचा धुमाकूळ!**

मुलगी रेहाना मुश्ताक पठाण आणि तिचं लहान बाळ होते. रात्री सर्वजण झोपलेले असताना दरवाजाचा आवाज आल्याने कुटुंबीय जागे झाले. दरवाजा तोडून सहा चोरट्यांनी घरातील तिन्ही व्यक्तींना लोखंडी सळई व चाकूने मारहाण केली.या घटनेत महिलांच्या अंगावरील सुमारे अडीच तोळे सोन्याचे दागिने चोरट्यांनी चोरून नेले. घटनेनंतर हसन पटेल यांनी तात्काळ रात्री ३ वाजता पोलिसांच्या ११२ या आपत्कालीन क्रमांकावर कॉल केला. माहिती मिळताच अर्ध्या तासाच्या आत

पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाहणी केली.या घटनेची माहिती मिळताच ब्राम्हणवाडाचे उपसरपंच

सुभाष गायकर, सदस्य शिवाजी आरोटे, रवींद्र हांडे,पोलीस पाटील डॉ.शिवाजी हांडे, तंटामुक्ती अध्यक्ष शिवराम आरोटे, ग्रामस्थ सागर गायकर, वैभव हांडे आणि बाळासाहेब भागवत यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, ब्राम्हणवाडा येथे धाव घेतली. उपसरपंच सुभाष गायकर यांनी सांगितले की, आम्हाला घटनेची माहिती मिळताच आम्ही तात्काळ अकोले पोलीस स्टेशनची संपर्क करून या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात यावी असे सांगितले आहे. पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी सांगितले की, सध्या पठार भागात अशा प्रकारच्या घटना वाढल्या असून, पोलिसांनी या चोरांवर करडी नजर ठेवली आहे. पोलीस सर्व परिसरात गस्त घालत असून, लवकरच यावर मोठी कारवाई केली जाईल. ब्राम्हणवाडा गावचे पोलीस पाटील आणि ग्राम सुरक्षा दलाचे बाळासाहेब भागवत यांनी ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, सध्या ब्राम्हणवाडा भागात कोणत्याही फेरीवाला किंवा बाहेरील व्यक्तीला प्रवेश दिला जात नाही. अशी व्यक्ती फिरताना दिसल्यास तिच्यावर लक्ष ठेवण्याचे काम आम्ही करत आहोत.

**भंडारदरा धरणाचा शताब्दी महोत्सव!**

या समिती मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे मुख्य सचिव, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

अहील्यानगर उत्तर जिल्ह्याच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरलेल्या भंडारदरा जलाशयाचा शताब्दी महोत्सव साजरा करण्यासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शताब्दी महोत्सव समिती गठीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. भंडारदरा धरणास आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे जलाशय असे नाव देण्याचा निर्णय यापुर्वीच केला होता.

धरणास यंदा शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. धरणाचे शंभरावे वर्ष या भागाच्या विकासात्मक दृष्टीने साजरे व्हावे आशी संकल्पना जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडून त्याची कार्यवाही सुरू केली आहे. अकोले तालुक्याच्या नैसर्गिक आणि भौगोलिक पार्श्वभूमीवर भंडारदरा धरणाची निर्मिती झाली. या धरणामुळे उतर जिल्ह्याच्या अकोले, संगमनेर, राहाता, श्रीरामपूर, नेवासा या तालुक्यांतील सिंचन क्षेत्रात मोठी वाढ झाली.या भागातील कृषी, सहकार आणि अर्थिक विकासाला मोठे पाठबळ मिळाले.यामुळे जिल्ह्याचा विकास होवू शकला.

भंडारदरा जलाशयाचे संवर्धन करतानाच या भागातील पर्यटन विकासासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रयत्न सुरू केले असून प्राथमिक आराखडा तयार होत आहे. पर्यटन विकासामुळे या भागात रोजगार निर्मिती होईल, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शताब्दी वर्षाच्या निमिताने याबाबतचे सर्व निर्णय होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेली समिती महत्वपूर्ण ठरणार आहे.

भंडारदरा जलाशयाचा शताब्दी महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शताब्दी महोत्सव समिती तयार करण्याच्या निर्णयाचे आपण स्वागत करीत असून भंडारदरा जलाशयाचे संवर्धन आणि पर्यटन विकासाला अधिकचे पाठबळ मिळेल अशी प्रतिक्रीया मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.


**पाहिजेत** नामांकित कन्स्ट्रक्शन कंपनीसाठी अनुभवी कर्मचारी पाहिजे.

| पदाचे नाव | पद संख्या |
|---|---|
| सिव्हिल इंजिनियर (दोन वर्षाचा अनुभव) | 3 |
| साईट सुपरवायझर (दोन वर्षाचा अनुभव) | 4 |
| अकाउंटंट (वाणिज्य शाखा पदवीधर,दोन वर्षाचा अनुभव) | 2 |
| डाटा एन्ट्री ऑपरेटर (अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर) | 2 |

7083429096/7710771055

टॉप टेन इम्पिरियर, पहिला मजला, शॉप नंबर 27 रिलायन्स, डिजिटलच्या वर, पुणे नाशिक रोड, संगमनेर -422605

जाहिरात छोटी..... प्रतिसाद मोठा.

छोट्या जाहिरातीचे दर
रु.300/-
3+1 (4) दिवस
शब्द मर्यादा 40 फक्त

सेल्समन पाहिजेत
जेन्ट्स सेल्समन - 2 जागा
लेडीज सेल्समन - 3 जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर- 2 जागा
सारिका ड्रेसेस
बाजारपेठ, संगमनेर
9822358335

जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746








'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल ॲण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर





सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव सिल्क साड्यांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
१५ जुलै २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.
१९५९ पासून राजेंद्र विश्वासाची सार्थ परंपरा...


# जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध : आमदार खताळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



महायुती सरकारच्या माध्यमातून आपण तालुक्यातील सर्व गावांमध्ये विकासकामे करणार आहोत. सर्व रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात येणार असून ठेकेदारांची मर्जी न राखता कामाच्या दर्जाकडे लक्ष दिले जाणार आहे. संगमनेरातील सर्वच गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील नांदुरी दुमाला येथे जिल्हा नियोजनमधून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या नांदुरी दुमाला ते ठाकरवाडी रस्ता मजबुतीकरण करणे २ लाख रुपये, जनसुविधा विशेष अनुदान योजनेमधून नांदुरी दुमाला येथे गाव अंतर्गत रस्ता करणे १० लाख रुपये, ग्रामपंचायत १५ वित्त आयोगातून जिल्हा परिषद शाळा भिंत बांधकाम करणे ३ लाख १८ हजार, कचरा विलगीकरण शेड बांधणे २ लाख रुपये, महालक्ष्मी मंदिर परिसरात शौचालय मुतारी बांधणे ३ लाख, भूमिगत गटार बांधणे ३ लाख रुपये रस्ता मजबुतीकरण करणे तसेच हनुमान मळा रस्ता मजबुतीकरण करणे २ लाख रुपये आणि शिवरस्ता मजबुती करण करणे दीड लाख रुपये अशा एकूण ६० लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा शुभारंभ आ. अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते माधव कवडे होते. यावेळी व्यासपीठावर सरपंच निखिल निळे, उपसरपंच सोनबा पथवे, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, भाजप राज्य परिषद सदस्य दादाभाऊ गुंजाळ, भाजपचे उपाध्यक्ष अशोक कानवडे, दिलीप कोल्हे, सुनील कानवडे, शिवसेनेचे ॲड. मिनानाथ शेळके, माजी सरपंच अर्चना शेळके, अर्चना शेटे, सुमन शेटे, सोमनाथ नेहे, संजय कवडे, संदीप शेटे, संपत कानवडे, किसन शेटे, सूर्यभान शेटे यांच्यासह नांदुरी दुमाला परिसरातील महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, गेल्या चाळीस वर्षांपासून या तालुक्यात काहीनी केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केले आहे. त्यांनी गोरगरीब जनतेच्या जीवावर अन्यायकारक प्रथा रुजवल्या. पण आता हे सगळं बंद होणार आहे. नवीन विजेचे रोहित्र घेण्यासाठी कोणालाही एक रुपया ही देऊ नका, जर कोणी मागत असेल तर मला सांगा. त्यांनी पैसे घेण्याची वाईट प्रथा पाडून ज्या खुट्ट्या ठोकल्या आहेत, त्या खुट्ट्या काढण्यासाठी थोडा वेळ लागेल परंतु त्या शंभर टक्के काढल्या शिवाय आपण राहणार नाही असाही विश्वास आमदार खताळ यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील कार्यकर्ते हे माझे कुटुंब आहे. त्यांच्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहिलं, तर गाठ माझ्याशी आहे हे लक्षात ठेवावे असा इशारा देत ते म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे त्रिदेव आपल्या मागे भक्कमपणे उभे आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी तर माझे पालकत्व घेतले आहे, त्यामुळे विकास निधी आणण्यासाठी कुठलीही अडचण येणार नाही. त्यामुळे तुमच्या गावासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असा ही विश्वास त्यांनी व्यक्त केला. गावात काही लोक पुढारी होतील, त्यांच्याशी अजिबात स्पर्धा करू नका. त्यांनी जे केलं त्याचा आदर ठेवा, कोण काय बोलतो त्याकडे लक्ष देऊ नका. ते तुमच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करतील. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून आपले काम प्रामाणिकपणे करत रहा असा सल्लाही आमदार खताळ यांनी कार्यकर्त्यांना दिला.

■ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत बांधून पूर्ण झाली आहे. मात्र ते अद्याप सुरू झालं नाही. माजी सरपंच मीनानाथ शेळके यांनी हा मुद्दा आपल्या निदर्शनास आणून दिला आहे. त्यावर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समवेत मुंबईत बैठक घेतली. लवकरच कर्मचारी भरती करून हे आरोग्य उपकेंद्र सुरू केलं जाईल आणि त्याचा शुभारंभ देखील पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते केला जाईल. असेही आमदार खताळ यांनी सांगितले.

# राज्यघटनेवर होणाऱ्या आघातांविरुद्ध संघटित व्हा : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




महाकवी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, विविध संत, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महात्मा गांधी, समाज सुधारक यांना त्रास देणारी धर्मांध वृत्ती आजही कार्यरत आहे. हे लोक वेळीच ओळखा गोरगरिबांना सर्वसामान्य माणसाला किंमत ही राज्यघटनेमुळे असून राज्यघटनेवर होत असलेल्या आघाताविरुद्ध सर्वांनी संघटित होऊन लढा असे आवाहन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावा अशी मागणीही त्यांनी केली.

बस स्थानकासमोर मातंग एकता समाज व सकल मातंग समाजाच्या वतीने १०५ व्या जयंती निमित्ताने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. याचबरोबर लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी आ. डॉ. सुधीर तांबे, ज्ञानेश्वर राक्षे, विश्वास मुर्तडक, अमर कातारी, प्रमिला अभंग, प्रा. बाबा खरात, राजेंद्र आव्हाड, दत्ता लाहुंडे, किशोर साळवे, संदीप आव्हाड, संजय जमदाडे, बाबासाहेब साळवे, बापू लहूनडे, गणेश बलसाने, शिवाजी आव्हाड,मनीष राक्षे, वेदांत राक्षे, राजेंद्र राक्षे, विकी पवार, देवेंद्र साळवे, सचिन शेलार, विनोद साळवे, शुभम आव्हाड, किशोर आव्हाड, संतोष गायकवाड, विश्वनाथ आव्हाड, जगन्नाथ आव्हाड, डि. के. जाधव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

माजी आमदार डॉ. तांबे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, संत, समाज सुधारक आणि फुले, शाहू, आंबेडकरांचा हा महाराष्ट्र आहे. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रामध्ये मोठे योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे विचार कृतीत आणले पाहिजे. त्यांनी ज्या समतेसाठी आवाज उठवला त्या समतेकरता आज पुन्हा आवाज उठवण्याची गरज आहे. लोकशाहीची दररोज पायमल्ली होत असून लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी काम करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सोमेश्वर दिवटे, गणेश मादास, नितीन अभंग, राजेश वाकचौरे, पप्पू कानकाटे आदींसह काँग्रेस व मातंग समाजाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नायक ANCHOR

# कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान विद्यार्थ्यांसाठी प्रभावी साधन : प्राचार्य वडितके



**नायक वृत्तसेवा, आश्वी**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी साधन आहे. याचा योग्य वापर केल्यास शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ आणि मनोरंजक बनू शकते. ए आय चा वापर करून विद्यार्थी अभ्यासाची तयारी लवकर व प्रभावीपणे करू शकतात असे प्रतिपादन आश्वी इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य देवराम वडितके यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या संगमनेर तालुक्यातील आश्वी इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता लॅबच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य देवराम वडितके बोलत होते.यावेळी सुभाष म्हसे,सुमतीलाल गांधी, सिताराम चांडे, अनिल मंन्तोडे, वैभव ताजणे, पर्यवेक्षक दिपक चव्हाण, विभाग प्रमुख बी. एम. सहाणे, रमेश थेटे, मोहन घिगे, उषा घिगे, मुन्तोडे,पाटील यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यालयामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाबरोबरच विद्यार्थ्यांना थ्रीडी प्रिंटिंग या विषयावर शिक्षण देण्यात येत असुन काळाबरोबर ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी पुढे जाणे आवश्यक असल्याचे मत पर्य़वेक्षक दिपक चव्हाण यांनी व्यक्त केले. सुत्रसंचालन सुवर्णा वाकचौरे यांनी तर आभार बागुल यांनी मानले.

■ थ्रीडी प्रिंटिंग ही एक अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली आहे, जी संगणकाद्वारे डिझाइन केलेल्या त्रिमितीय थ्रीडी वस्तूंना प्रत्यक्ष रूपात छपाई करून तयार करण्यासाठी वापरली जाते. याचा वापर करून उत्पादनात अचूकता आणि सुसूत्रता येते तसेच वेळ व खर्चात बचत होते.तसेच यामुळे सर्जनशीलता आणि वैयक्तिक डिझाईनची मुभा मिळते व याचा वापर लघुउत्पादनासाठी उत्तम पर्याय असल्याचे बी. एम. सहाणे यांनी यावेळी सांगितले.

# किरकोळ कारणावरून पती-पत्नीला शिवीगाळ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

पाण्याच्या किरकोळ वादावरून पती-पत्नीला शिवीगाळ करण्यात आल्याची घटना शहरातील गोल्डन सिटी परिसरात शुक्रवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी बबन काशिनाथ मंडलिक या किराणा व्यावसायिकाने शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावरून अविनाश राऊत याच्यावर अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

बबन मंडलिक (वय ६६) हे शुक्रवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास त्यांच्या दुकानात बसलेले असताना त्यांच्या घरासमोर राहणारा अविनाश राऊत याने पाण्यावरून मंडलिक यांना वाईट साईट शिवीगाळ केली. तेव्हा मंडलिक त्याला समजावून सांगत असतांना त्याचा राग येऊन अविनाश राऊत याने मंडलिक यांच्या गालावर चापट मारली.

हा आवाज ऐकून मंडलिक यांच्या पत्नी शोभा तेथे आले असता त्यांनाही अविनाश राऊत याने शिवीगाळ करून ढकलून दिले. याप्रकरणी शहर पोलिसांनी मंडलिक यांच्या फिर्यादीवरून अविनाश राऊत याच्यावर अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.


श्री गणेश
शिलाई मशिन
शिलाई मशिन विक्री व दुरुस्तीचे विश्वसनीय ठिकाणी...!
पुणे - नाशिक हायवे, नवघर गल्ली, संगमनेर जि. अ. नगर
9822558815

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल सेल सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
लेडीज वेअर I मेन्स वेअर किड्स वेअर
8390005001
संगमनेर 422605

Aapki Wealth Ke Liye,
SIP SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
Sahi Hai..!
फक्त ₹5000 प्रति महिना इन्वेस्ट करून बना करोडपती
अधिक माहितीसाठी संपर्क साधा.
KADLAG INVESTMENT ...Dreams make sense...
म्युच्यूअल फंड्स : 9142773000, 9422855786
Mutual Fund investments are subject to market risks, please read all scheme related documents carefully.
एस - 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पेरीअल, यशोधन समोर, संगमनेर 422 605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
कुटे हॉस्पिटल ॲण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५